# महाविद्यालय विकास समिती

## वार्षिक अहवाल २०२०-२१

सार्वजनिक विद्यापीठ अधिनीयम २०१६ मधील कलम ९७ अन्वये महाविद्यालय विकास समिती महाविद्यालयात गठीत करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीत पार पडलेल्या कामकाजाचा आढाव पुढील प्रमाणे.

- पदवी महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीच्या मागील सभेतील कामकाजाची माहिती सभेसमोर सादर करण्यात आली व इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.
- आर्थिक वर्ष २०१९-२० च्या अनुदानित व विनाअनुदानित विभागाचे सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले जमाखर्च पत्रक, ताळेबंद यावर सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.
- दि. ०१/०१/२०२० ते ३१/०६/२०२० या कालावधीतीत कर्मचाऱ्यांनी उपभोगलेल्या रजा नियमबरहुकूम असल्यामुळे रजांना मंजूरी देण्यात आली.
- नविन शैक्षणिक धोरण २०२०, नूसार येत्या पाच वर्षासाठी महाविद्यालयाचा बृहद आराखडा बनवण्याच्या दृष्टीने विचार विनीमय करून महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी समितीने विद्यार्थी व शिक्षण क्षेत्रातील तज्ञ मंडळी यांचे कडुन सूचना घेऊन पायाभूत सुविधा व आर्थिक सहाय्य यांचा विचार करून एका विशिष्ठ पद्धतीने पुढील ५ वर्षाचा ( शै.व. २०२०-२१ ते २०२४-२५) वृहत आराखडा तयार करावा असा ठराव करण्यात आला.
- येत्या शैक्षणीक वर्षात नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक पायाभुत सुवीधा संबधी विचार विनीमय करण्यात आला व सर्वानूमते असे ठरविण्यात आले की, आर्थिक उपलब्धतेचा आढावा घेऊन संगणक संख्या व उपकरणे यांचा प्राधान्यक्रम ठरवुन प्राचार्यांनी सदरची खरेदी प्रक्रीया राबवावी.
- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी महाविद्यालयातील पदवी व पदव्यत्तर विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची कार्यभारानुसार नियुक्ती व वेतन निश्चिती यावर सविस्तर चर्चा होऊन शैक्षणिक पात्रतेनुसार वेतन देण्यात यावे असे सांगण्यात आले.

- महाविद्यालयातील पदवी व पद्व्यत्तर विभागातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या वेळी विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे घेण्यात आलेल्या कॉशन मनी, ग्रंथालय व प्रयोगशाळेच्या अनामत रक्कमा विद्यार्थ्यांनी वेळेत परतावा न घेतल्याने महाविद्यालयाकडे शिल्लक असल्याचे सभेला सांगण्यात आले. शासनाच्या प्रचलित नियमांनूसार सदरच्या रकमा महाविद्यालयाला विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा, उपकरणे व फर्निचर खरेदी करण्यास वापरता येतात असे सभेला सांगण्यात आले. महाविद्यालयाच्या ग्रंथालय समितीच्या दि. १४ ऑगस्ट २०२० च्या सभेमध्ये चर्चा होऊन ग्रंथालयाच्या शिल्लक अनामत रक्कमेचा शासनाच्या नियमानूसार विनियोग करण्याविषयी महाविद्यालय विकास समितीकडे शिफारस करण्यात आली होती.

  यावर सविस्तर चर्चा होऊन महाविद्यालयातील पदवी व पद्व्यत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी वेळेत परतावा न घेतल्याने शिल्लक असलेल्या कॉशन मनी, ग्रंथालय व प्रयोगशाळेच्या अनामत रक्कमा विद्यापीठ व शासनाच्या नियमानूसार विनीयोग करण्यात यावा असा ठराव करण्यात आला,

- आर्थिक वर्ष २०२०-२१ चे अनुदानित व विनाअनुदानित विभागाच्या अंदाजपत्रकांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र.एनजीसी २०२०/(११५/२०)/मशि-४ दिनांक १८ सप्टेंबर २०२० अन्वये देवरूख शिक्षण प्रसारक मंडळाच्या दि. २५/०९/२०२० रोजीची परिपत्रकीय सभेमध्ये व दि.२५/०९/२०२० रोजीच्या महाविद्यालयाच्या नियामक मंडळाच्या सभेमध्ये करण्यात आलेल्या ठरावाला अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाचे सॅटेलाईट सेंटर कडवई येथे स्थापन करण्याचा प्रस्ताव मुंबई विद्यापीठाकडे सादर करण्यात आला असल्याचे सभेला सांगण्यात आले.

NYA. ATHALYE, VED. SAPRE, VID. PITRE COLLEGE DEVRUKH

प्राचार्य